यवतमाळ जिल्हयांतील आदिवासी महिलांचे जनजीवन व सद्यस्थिती : एक समाजशास्त्रीय अध्ययन

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत समाजशास्त्र विषयातील पीएच्. डी. पदवी

संपादन करण्याकरीता सादर करण्यात येणारा

संशोधनाचा आराखडा

संशोधक

शीतल चंद्रकांत डवले

मार्गदर्शक

डॉ. शेकोबा परशुराम ढोले

सहाय्यक प्राध्यापक

श्री दत्त कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हदगाव

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे विद्या संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

२०२२

अनुक्रमणिका

	अनुक्रमणिका	
	मुखपृष्ठ	i
	अनुक्रमणिका	ii
	विवरण	
१.१	प्रस्तावना	१
	१.१.१ आदिवासी संकल्पना	३
	१.१.२ आदिवासी महिलांचे जीवनमान	४
१.२	अध्ययन विषयाची निवड	७
१.३	अध्ययनाचे महत्व	८
१.४	अध्ययनाची उदिदष्टे	९
१.५	अध्ययनाची गृहीत कृत्ये	९
१.६	अध्ययनाची व्याप्ती व मर्यादा	१०
१.७	संबंधित पूर्व संशोधनांचा आढावा	१०
१.८	अध्ययन पध्दती	१२
१.९	संशोधनाची जनसंख्या व नमूना	१२
	१.९.१ नमूना निवड	१३
१.१०	संशोधनाची साधने	१३
	१.१०.१ तथ्य संकलन	१४
	१.१०.२ व्दितीय तथ्य संकलन	१४
	१.१०.३ साधनांचे प्रमाणिकरण	१४
१.११	तथ्यांचे संकलन	१४
१.१२	सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन	१५
	१.१२.१ सांख्यिकीय तंत्रे	१५
१.१३	निष्कर्ष	१५

१.१४	शिफारशी	१५
१.१५	प्रकरणाची रचना	१५
	संदर्भ ग्रंथ सूची	१६
	परिशिष्टये	१६
	संदर्भ ग्रंथ	१७

यवतमाळ जिल्हयांतील आदिवासी महिलांचे जनजीवन व सद्यस्थिती : एक समाजशास्त्रीय अध्ययन

१.१ प्रस्तावना :

आजच्या घडीला संपूर्ण जगात जवळपास ५००० आदिवासी समूह आहेत. ज्यांची लोकसंख्या ३७ कोटींच्या आसपास आहे. तसेच संपूर्ण जगात आदिवासींच्या जवळपास ७००० भाषा आहेत. भारतात आदिवासी समाजाची लोकसंख्या ही जवळपास १० कोटी असून ती भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ८.६०% आहे. याचाच अर्थ असा की, भारतात आदिवासींची खूप मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या असून हा समाज अगदी प्राचीन कालखंडापासून भारतात वास्तव्य करून आहे. भारतीय राज्यघटनेत त्यांचा अनुसूचित जमाती (Schedule Tribe ST) असा उल्लेख करण्यात आलेला असून त्यांना शिक्षण, नोकरी इत्यादी क्षेत्रांमध्ये प्रतिनिधित्व म्हणजे आरक्षणाची तरतूद करण्यात आलेली आहे. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान मोठे आहे.

भारतात १८७१ मध्ये प्रथमत: जनगणना झाली. त्यानंतर १९४१ पर्यंतच्या जनगणनेमध्ये आदिवासींचा समावेश हा हिंदू अथवा कोणत्याही धर्मात केला जात नव्हता. १९५१ च्या जनगणनेपासून मात्र त्यांचा हिंदू धर्मात समावेश करण्यात येऊ लागला. त्याआधी १८७१ मध्ये Other Religion, १८८१ मध्ये ऐबरिजनल, १८९१ मध्ये Forest Tribe, १९०१ व १९११ मध्ये एनिमिस्ट, १९२१ मध्ये प्रिमिटिव, १९३१ मध्ये Tribal Religion तर १९४१ मध्ये Tribe अशा नावांनी त्यांची गणना करण्यात आलेली होती.

आदिवासी हा शब्द आदि आणि वासी या दोन शब्दांपासून तयार झालेला आहे. याचा अर्थ आधीपासून किंवा आदिम कालखंडापासून वास करणारा समाज असा होतो. भारतात कुठेही पाहिले तरी हा समाज बहुतांशी डोंगरदऱ्यांमध्ये राहतो. यामुळे काही विशिष्ट संघटना त्यांना वनवासी असे म्हणतात. पण हा शब्दच्छल असून खोडसाळपणा आहे. आदिवासी या शब्दाला सांस्कृतिक व ऐतिहासिक संदर्भ आहेत. आदिमत्त्व हे त्यांचे एक महत्त्वाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. तर वनवासी या शब्दाला फक्त भौगोलिक संदर्भ आहे. म्हणून आदिवासी हाच शब्द वापरणे योग्य आहे.

सर्वत्र भारतभर आदिवासी समाज डोंगरदऱ्यांमध्ये रानावनामध्ये राहतो. त्यांचे संपूर्ण जीवन हे वनांवर, जंगलामध्ये मिळणाऱ्या नैसर्गिक साधनसामुग्रीवर ज्यामध्ये जंगलातील लाकडे, मोहाची फुले, तेंदूची पाने, शिकार इत्यादीवर अवलंबून होते. परंतु इंग्रजांनी जेव्हा १८६४ मध्ये वन

कायदा लागू केला, तेव्हापासून आदिवासींची जगण्याची साधने कायमची हिरावली गेली. याला आता १५६ वर्षे लोटून गेली आहेत. २००६ मध्ये वनहक्क कायदा केला गेला. परंतु येथील नोकरशाहीच्या असंवेदनशील वृत्तीमुळे त्यांना त्यांचे हक्क अजूनही मिळू शकलेले नाहीत.

आदिवासी समाजात स्त्रियांचे प्रमाण साधारणपणे ५०% आहे. स्त्री ही मातृत्वाची भूमिका पार पाडते. प्रत्येक व्यक्तीच्या जिवनातील पहिला गुरु आई असते. आईने दिलेल्या संस्काराची परिणामकता भावी पिढीच्या जडण घडणाशी संबंधीत आहे. त्यासाठी स्त्री ही सुशिक्षित व सुसंस्कृत असणे आवश्यक आहे. आदिवासी महिलांची प्रगल्भता, जाणकारी, साक्षरता इतर महिलांपेक्षा कमी आहे. महिलांच्या सहभागाशिवाय कुटुंबास पूर्णत्व प्राप्त होत नाही. आदिवासी महिलांची साक्षरता आणि जागरूकता इत्यादि बाबी कमी प्रमाणात आहेत. विकास प्रक्रियेमध्ये महिलांचा सहभाग महत्वाचा आहे.

भारतीय जनगणना २००१ प्रमाणे महाराष्ट्र राज्याची एकूण लोकसंख्या ९,६८,७८,६२७ इतकी असून त्यामध्ये ५,०४,००,५९५ पुरुष आहेत व ४,६४,७८,०३१ महिला आहेत. या वरुन दर हजार पुरुषामागे ९२२ स्त्रिया आहेत. म्हणजेच १०००:९२२ असे प्रमाण आहे.

महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येपैकी ८५,७७,२७६ इतकी लोकसंख्या आदिवासींची आहे. त्यात ४३,४७,७५४ पुरुष तर ४२,२९,५२२ महिला आहेत. या वरुन दर हजार आदिवासी पुरुषामागे ९७३ आदिवासी महिला आहेत. म्हणजेच १०००:९७३ असे प्रमाण आहे.

एखाद्या समाजाची सर्वांगिण प्रगती किंवा विकास साधावयाचा असेल तर त्या समाजातील घटक बलवान, सुदृढ व शिक्षित असणे अत्यंत आवश्यक आहे. या दृष्टीकोनातून विचार केल्यास आदिवासी समाज आज अज्ञानाच्या, दारिद्रयाच्या अंधारात चाचपडत आहे. त्यांना या अंधारातून प्रकाशाकडे नेण्यासाठी शिक्षण हा घटक उपयोगी ठरणार आहे. विशेषकरुन आदिवासींमध्ये महिलांच्या निरक्षरतेचे प्रमाण अतिशय जास्त आहे.

"स्त्री व पुरुष हे समाजाचे दोन पंख आहेत. केवळ एका पंखाने पक्षाला उडता येत नाही. त्यांचे दोन्ही पंख मजबूत असावे लागतात. समाजाचेही तसेच आहे. असे स्वामी विवेकानंद म्हणतात. जन्मापासून मृत्युपर्यंत स्त्रीला वेगवेगळया भूमिका पार पाडाव्या लागतात. मुलगी, बहीण, पत्नी, सून, आई, म्हणून ती वेगवेगळया रुपात पुरुषांना मान देते आणि या भूमिका बजावतांना तिला अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. तिचे हक्क, तिचे कर्तव्य अणि तिला असणारी जबाबदारीची जाणीव यामुळे तिला समाजात एक दर्जा प्राप्त होतो.

अमेरिकेतील प्रसिध्द सामाजिक मानवशास्त्रज्ञ रॉबर्ट लावी यांनी आदिम समाजातील स्त्रीचा दर्जा ठरवतांना -प्रत्यक्ष वागणूक, कायदेशीर वागणूक, सार्वजनिक कामाची संधी, कामाचे स्वरूप व व्याप्ती या चार गोष्टी विचारात घ्याव्यात असे सुचविले आहे. वंशपरंपरा, लग्नानंतरचे निवासस्थान, सत्तापध्दती, अर्थिक सहयोग या बार्बीचाही स्त्रियांच्या जीवनमानावर परिणाम होतो. डोरोची हामन्ड आणि अल्टा जॅबलो (१९७७) यांच्या मते जगातील सर्व समाजात, अथवा सर्व समाजाच्या लिखित इतिहासात प्रामुख्याने कुटुंब हेच स्त्रीचे कार्यक्षेत्र असते. तिचे नातेसंबंध आणि तिची जडणघडण ही कुटुंबाशी निगडीत असते. कुटुंबातील तिच्या भूमिकेचा, जीवनमानाचा अभ्यास करणे म्हणजे तिला समजून घेणे किंवा तिचा दर्जा, जीवनमान व सद्यस्थिती समजून घेणे आवश्यक आहे.

आदिवासी स्त्री ही शहरी अथवा ग्रामीण स्त्रियांपेक्षा भिन्न असते. आदिवासी "स्त्री" पुरुषा सारखी निडर असते. ती रानावनातून मुक्तपणे संचार करीत असते, इतर स्त्रियांपेक्षा ती परिश्रमी असते, इतर स्त्रियांसारखी लाजाळू नसलेली आदिवासी स्त्री अतिशय प्रामाणिक असते. आपला पती निवडण्याचा अधिकार आदिवासी मुलींना असतो. मानववंश शास्त्रज्ञांनी जगातील वेगवेगळया भागातील स्त्रियांचे स्थान या विषयावर अभ्यास प्रस्तुत केला आहे. यातील संशोधनानुसार स्त्रियांचे कुटुंबातील स्थान या बाबत परस्परभिन्न मते असलेली आढळून येतात. काही संशोधकांच्या मते आदिम जमातीत स्त्रियांचे कुटुंबात स्थान अथवा दर्जा हे फार वरचे असते तर काहींच्या मते आदिम जमातीतील स्त्रियां या दबलेल्या असतात, पुरुषांच्या वर्चस्वाखाली असतात. आदिवासी समाजाच्या विकासाच्या दृष्टिने आदिवासी महिलांच्या जीवनमानाची सद्यस्थिती काय आहे हे पाहणे गरजेचे आहे. त्याकरिता आदिवासी महिलांचे जीवनमान व सद्यस्थिती या संशोधन विषयाची निवड करण्यात आली आहे.

१.१.१ आदिवासी संकल्पना :

आदिवासी पिढयापिढया जंगल दऱ्यात राहतात. अमेरिकेत त्यांना इंडियन दस्यु निशाद इत्यादी नावाने ओळखले जाते. त्यांच्या वंशजांनाच भारतात आदिवासी संबोधिले जाते. आदिवासी समानार्थी एबोरिजिनल इंडियनस देशज, मुल निवासी, जनजाती, वनवासी जगली, गिरिजन, बर्बर इत्यादी शब्दाचा वापर केला जातो. या सर्व शब्दांच्या मागे सामाजिक, राजनैतिक व भौगोलिक संदर्भ आहे. भारतात १० कोटी आदिवासी लोकांचे वास्तव्य आहे. एकूण लोक संख्येशी हे प्रमाण ८.६ टक्के आहे.

विविध मानवशास्त्र व अभ्यासक यांनी आदिम समाजाच्या व्याख्या पुढील प्रमाणे केल्या आहेत.

१) गिलिन यांच्या मते,

एका विशिष्ट भुप्रदेशावर राहणारा समान बोलीभाषा बोलणारा व समान संस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिय गटाच्या समुच्चयाला आदिवासी समाज असे म्हणतात.

२) मदन व सजूमदार यांच्या मते,

"समान भाषा व समान संस्कृती असणाऱ्या व आर्थिक दृष्टिने परस्पर संबंध असणाऱ्या ग्रामीण समुदायाच्या समुच्चयाला आदिवासी असे म्हणतात."

विविध मानवशास्त्रज्ञ व अभ्यासक यांनी केलेल्या वरील सर्व व्याख्यावरुन असे लक्षात येते की, विशिष्ट भूप्रदेश, समान संस्कृती, समान बोलीभाषा, एकता व निरक्षरता ही वैशिष्ट्ये धारण करणाऱ्या समुहाला आदिवासी म्हणून ओळखले जाते.

१.१.२ आदिवासी महिलांचे जीवनमान :

बहुसंख्य आदिवासीचे वास्तव्य जंगली भागात असते. त्यामुळे जगलातुन प्राप्त होणाऱ्या वनउपज वस्तुची इत्थभूत माहिती त्यांना असते. ही वनउपजे गोळा करणे हे त्यांचे नित्य नेमाचे काम असते जळावू लाकूड गोळा करणे, डिंक, मोहफुले, चारोळ्या मध, तेंदुपत्ता संकलन इत्यादी कार्यामुळे त्यांना आर्थिक लाभ मिळते. अलिकडे वनहक्क कायद्याचा अस्तित्वामुळे त्यात अधिक भर पडली आहे. या कायद्यामुळे त्यांना गौण वनौपजे गोळा करण्याचा अधिकारच प्राप्त झाला आहे. गौण वनौपजे म्हणजे इमारती लाकूडाच्या व्यतिरिक्त लाकूड (बांबू, ब्रशवूड, खोडे) त्याचबरोबर वेत, सट, कोब, मेण लाख, औषधी वनस्पती, कंद, मुळे वनस्पतीजन्य वस्तू औषधी वनस्पती इत्यादींचा समावेश आहे.

परंपरेने वनात निवास करणाऱ्या आदिवासींना हक्काची जागा आणि वहिवाटीच्या जागेवर मान्यता देणारा केंद्राचा अनुसूचित जमाती व परंपरागत वन निवासी कायदा ३१ डिसेंबर २००७ ला अमलात आला. १ जानेवारी २००८ पासून तो महाराष्ट्रात लागू झाला. त्यामुळे वनाचे संवर्धन व आदिवासींना जमीनधारक घेण्याचा मार्ग मोकळा झाला. या कायद्याच्या अमलबजावणीसाठी महाराष्ट्रात गावपातळीवर १५ हजार वनहक्क समित्या, २८ जिल्हा समित्या व ४ विभागीय समित्यांवर हक्क राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आल्यात. ग्राम पातळीवर असलेल्या

वनहक्क समित्यांच्या मदतीसाठी तलाठी, ग्रामसेवक आणि इतर शासकीय कर्मचारी यांची सेवा उपलब्ध करण्यात येऊ लागली.

जंगलावर आणि वनजमिनीवर हक्क प्रस्थापित करण्यात आल्यामुळे आदिवासी महिलांना अर्थोत्पादनात मदत झाली. वनातील सर्व वनउपज गोळा करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. आदिवासांचे वास्तव्य अधिकांश जंगलातच असल्यामुळे आदिवासी महिला शेतीच्या कामातून मुक्त होताच जगलातील वनउपज वस्तु गोळा करतात. वस्तुच्या विक्रीतून आलेला पैसा कुटुंबाच्या उपजीविकेसाठी वापरतात. त्यामुळे शेती व्यवसायाच्या खालोखाल वनावरील अवलंबित्व हे आदिवासी महिलांचे एक प्रमुख वैशिष्टये दिसून येते. थोडक्यात, आदिवासी महिला कृषी क्षेत्रातच नव्हे तर वनउपज गोळा करण्यातही अग्रस्थानी आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाचा दृष्टीने व आदिवासीच्या सबलीकरणाच्या दृष्टीने ते एक अमुल्य व धाडसी पाऊल आहे.

१९०६ च्या शिक्षणविषयक राष्ट्रीय धोरणात मान्य करण्यात आले की आदिवासी लोक हे शिक्षणाच्या क्षेत्रात उर्वरित लोकसंख्येच्या तुलनेने निःसंशयपणे फारच मागे आहेत. आदिवासी विद्यार्थी मोफत शिक्षण, पाठ्यपुस्तक, गणवेश, लेखनसामुग्री, विद्यावेतन इ. चा लाभ घेतात आदिवासी मुलींना वरील सुविधांशिवाय उपस्थिती भत्ताही देण्यात येतो. महाराष्ट्रात आश्रमशाळांनी आदिवासी शिक्षणासाठी फार मोठे कार्य केले आहे. त्यात त्यांना मोफत शिक्षणाशिवाय भोजन, निवारा, पाठ्यपुस्तके, गणवेश, इत्यादीच्या स्वरूपात बऱ्याचशा सुविधा व प्रोत्साहनाची तरतूद करण्यात येते. आदिवासी विभागाच्या चालू अटी व घर्तीनुसार प्राथमिक शाळेमध्ये ४० विद्यार्थ्याकरिता एक शिक्षक ४१ ते ८० विद्यार्थ्यांकरिता दोन शिक्षक आणि ८१ ते १२० विद्यार्थ्याकरिता तीन शिक्षक नियुक्त करण्यात येतात. महाराष्ट्रात माध्यमिक शिक्षण हे साधारणतः खाजगी संस्थामार्फत चालविले जाते व अनुदानापात्र संस्थांना विहित सूत्रानुसार अनुदान दिले जाते. १९९४-९५ पर्यंत परवानगी दिलेल्या माध्यमिक शाळांना १०० टक्के अनुदान प्राप्त होते. आदिवासी उपयोजनांतर्गत शाळांना चौथ्या वर्षापासून १०० टक्के अनुदान प्राप्त होते.

नवीन शैक्षणिक धोरण १९८६ अन्वये निरक्षरता निर्मूलनाची कार्यपध्दपती यशस्वीरित्या राबविण्यासाठी राष्ट्रीय साक्षरता प्रचारक संघटना स्थापन करण्यात आली. या यंत्रणेने संपूर्ण साक्षरता मोहिम विशिष्ट क्षेत्रामध्ये राबविण्यासाठी सविस्तर अशी मार्गदर्शक तत्वे निश्चित केले आहेत. आदिवासी लोक बऱ्याच पोटभाषा बोलत असल्यामुळे एका विशिष्ट पोटभाषेत शिकविणे,

शिक्षकांना आणि शिकणाऱ्यांनाही फारच कठीण जाते म्हणून इ. ३ साठी आदिवासी बोलीभाषेत अचुक पुस्तके तयार करण्याचे प्रस्तावित केले आहे.

राष्ट्रीय साक्षरता प्रचारक संघटना / भारत सरकार यांनी ठरविलेल्या आर्थिक आकृतीबंधानुसार साक्षरतेचे शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक प्रौढामध्ये रु. ६५ आणि साक्षरोत्तर शिक्षण घेणाऱ्या प्रौढामध्ये रु. ४० असा दर ठरविलेला आहे. त्यात २ / ३ वाटा केंद्र शासन व १/३ वाटा राज्य शासन करते आदिवासी भागात केंद्र शासनाचा हिस्सा ४/५ व राज्याचा १ / ५ असा आहे. शिक्षण या शिर्षकातर्गत येणाऱ्या बहुताश योजना योजनेवर झाल्यामुळे सन २०१४-१५ साठी रु. ३६९९.५६ लाख इतकाच निधी मागणीनुसार ठेवण्यात आला आहे. विख्यात समाजशास्त्रज्ञ आणि विचारक कार्ल मार्क्स यांचे मतानुसार स्त्रीचा कोणताही वर्ग होत नाही. जगाची अर्धी जनसंख्या वर्गविहीन आहे, स्त्रीयांच्या वर्गाचे निर्धारण पुरूषांच्या वर्गानुसार होते. स्त्रीवादी विचारक सिनोनने आपल्या पुस्तकामध्ये म्हटले आहे की, नारी जन्म घेत नाही, घडविली जाते यावरून स्पष्ट होते की, स्त्रीयाच्या या अवस्थेला पितृसत्ताक पध्दतीच जबाबदार आहे. बहुसंख्य आदिवासी मुलींचे शिक्षण केवळ प्राथमिक शिक्षणापर्यंत होत असते. एकतर कमी वयात त्यांचे लग्न केले जाते अथवा सामाजिक बंधनामुळे किंवा साधनांच्या अभावामुळे त्यांना पुढचे शिक्षण सोडावे लागते. महात्मा गांधी शिक्षणांवर जोर देतांना म्हणतात, महिलांचे सशक्तीकरण तेव्हाच होऊ शकते की जेव्हा त्यांना त्यांचे कार्य आणि अधिकराची जाणिव होईल आणि याकरिता शिक्षण हेच फार मोठे शस्त्र आहे.

आदिवासी महिलांच्या शिक्षणाची ही अवस्था पाहिल्यानंतर त्यांच्या अल्पशिक्षीत किंवा अशिक्षीतपणाचे कारण स्पष्ट होते. परिणामतः बहुताश आदिवासी स्त्रीया केवळ वन उपज वस्तू गोळा करणे, मजूरी करणे किंवा कृषीचे काम करणे यामध्येच आपले जीवन व्यतीत करतात. आदिवासी समाजव्यवस्थेमध्ये अजूनही बालविवाह पध्दती अस्तीत्वात आहे. लवकर विवाह करण्याच्या रीतिरीवाजामुळे आदिवासी मुलींचे लग्न कमी वयात होत असतात शिक्षणाचे महत्त्व उमगले नसल्यामुळे प्राथमिक शिक्षणानंतर माध्यमिक किंवा उच्च शिक्षण घ्यावे अशी भावनाच त्यांच्यामध्ये दिसून येत नाही माता होऊन मुलांचे संगोपन करणे, कुटुंबाची सर्व जबाबदारी पेलणे येवढेच ध्येय निश्चित असते. कमी वयात लग्न होत असल्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो याची जाणीव मात्र आदिवासी स्त्रीयांना होत नाही. कुटुंबाचे पालनपोषण करण्यासाठी त्या जीवाचे रान करतात. कबाडकष्ट करतात. शेतीमध्ये राबराब राबतात. जंगलातून सरपन, वन

उपज वस्तू, कंद, मुळे, मोहफुले, डिंक, औषधी वनस्पती गोळा करण्यातच जीवन व्यतीत करतात. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन आदिवासी महिलांचे पराकोटीचे नुकसान होते. अनेक जडलेल्या आजारावर उपचार म्हणून त्या डॉक्टरचा सल्ला न घेता गावातील वैद्याकडे धाव घेतात. बहुसंख्य स्त्रीया अल्प आजाराने दीर्घकाळपर्यंत ग्रस्त राहतात. परिणामी त्यांचे आरोग्य धोक्यात येते व अकाली मृत्यूच्या संकटाला सामोरे जावे लागते. आदिवासी महिलांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन कृषी व संलग्न व्यवसाय हे आहे. कृषी मध्ये महिलांचा वाटा कमालीचा असतो आदिवासी भागात अर्थव्यवस्थेची कमान पुरुषाकडे असली तरी कृषी वर काम करित असतांना आदिवासी महिलांना खूप समस्यांना तोंड द्यावे लागते. एकतर त्यांच्याकडे जमीनीची मालकी नसते. निरीक्षरता, अनभिज्ञता, उदासिनता आणि अंधविश्वास त्यांच्या रस्त्यातील फार मोठी बाधा आहे. शिक्षा, सुचना व मनोरंजन या गोष्टी अपेक्षाकृत कमी असतात. त्यामुळे त्यांचे फार मोठे नुकसान होत असते. कृषीचे उत्पादन कार्य आदिवासी महिलोचे नित्य कार्य आहे. त्यांना कृषी व्यवसायाचे तंत्रज्ञान अवगत करण्यासाठी प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करायला पाहिजे. त्यांचे शिक्षण जास्तीत जास्त घेता येईल यासाठी परंपरागत व्यवसायापासून बाहेर काढण्याचे प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यानंतरच या महिलांच्या जीवनमानामध्ये सुधारणा होण्यास मदत होऊ शकेल.

१.२ अध्ययन विषयाची निवड :

यवतमाळ जिल्ह्यातील १६ तालुक्यांपैकी ११ बहूसंख्यांक तालुक्यात आदिवासी अनुसूचित जमाती प्रामुख्याने आल्या असून इतर तालुक्यात यांचे प्रमाण अल्प आहे. यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी समुदायाच्या अध्ययनात "यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी महिलांचे जनजीवन व सद्यस्थिती एक समाजशास्त्रीय अध्ययन" करणे महत्वाचे ठरते. इतर समाजातील संशोधन पाहता यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी समाजावर आणि प्रामुख्याने आदिवासी महिला विषयी संशोधन झालेले आढळून येत नाही. म्हणुनच "यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी महिलांचे जनजीवन व सद्यस्थिती एक समाजशास्त्रीय अध्ययन" हा विषय संशोधक मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाखाली निवडण्यात आले आहे.

आदिवासी जमातीच्या महिलांची वैशिष्ट्यपुर्ण परंपरा आर्थिक जीवन, शैक्षणिक स्थिती, सांस्कृतिक, धार्मिक जीवन या सर्व बाबींमुळे आदिवासी महिलांच्या जनजीवन व सद्यस्थितीचे अध्ययन करणे महत्वाचे ठरते. अनेक घटकांमुळे समाजजीवनावर झालेला परिणाम, विभिन्न

समस्या सामाजिक, राजकिय, शैक्षणिक, आर्थिक इत्यादी समस्या निर्माण झाल्या आहेत काय? त्या समस्याचे स्वरुप कसे? या करिता अध्ययन विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

आधुनिकतेकडे वाटचार करतांना आदिवासी महिलांची कौटूंबिक, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक सद्यस्थिती व दर्जाबाबत अध्ययन करणे महत्वपुर्ण आहे. यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी विकास योजनांची आखणी करण्यासाठी आदिवासी महिलांचे अध्ययन उपयुक्त ठरते. यापुर्वीच्या आदिवासी विकास योजनेचा लाभ किती महिलांना मिळाला? त्यामधून आदिवासी महिलांचा विकास किती झाला? योजनांची अंमलबजावणीतील बदल कोणते? या प्रश्नांच्या अनूषंगाने "यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी महिलांचे जनजीवन व सद्यस्थिती एक समाजशास्त्रीय अध्ययन."

तात्पर्य - यवतमाळ जिल्हा आदिवासी बहूल जिल्हा असल्यामुळे आदिवासी महिला व त्यांचे कुटूंब या परिसरातील भागात असलेल्या पाड्यावर आणि वाडी, खोप्या मधून राहतात प्रत्येकाचे वेगळे असे पाडे, वाड्या आहेत त्यामुळे निरनिराळ्या जमातीचे वैशिष्ट्ये घेऊन एक वेगळीच संस्कृती आकाराला आलेली आढळते. यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी महिलांची एकंदरीत सामाजिक, आर्थिक स्थिती व दर्जा देशातील तथा महाराष्ट्रातील आदिवासी महिलांसारखीच आहे का? किंवा या पेक्षा वेगळी आहे हे पाहणे महत्वाचे ठरते.

१.३ अध्ययनाचे महत्व :

प्रस्तुत अध्ययनात आदिवासी महिलांच्या अध्यनाचे महत्व पुढील बाबींवरुन दिसून येते.

१. या अध्ययनामुळे आदिवासी जमातीतील महिलांबाबत विशेष माहितीच्या ज्ञानात वाढ होईल.

२. आदिवासी जमातीच्या महिलांचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य व इतर समास्या कळण्यास मदत होईल.

३. आदिवासी जमातीतील महिलांच्या समुदायाला प्राप्त योजना, प्रत्यक्ष मिळालेला लाभ याबाबत माहिती मिळण्यास मदत होईल.

४. या संशोधनाचा विद्यार्थी, संशोधक, विविध संस्था, सामाजिक कार्यकर्ते, सामाजिक चळवळीचे कार्यकर्ते यांना या अभ्यासाचा फायदा होईल.

५. आदिवासी महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी झालेले प्रयत्न, कोणत्या शासकीय योजना सुरु आहेत? योजनांची अंमलबजावणीतील बदल कोणते?

६. त्यांना शैक्षणिक सुविधांचा लाभ मिळतो का? महिलांच्या जीवनमानात बदल झाला का? ह्यामुळेच दुर्लक्षीत असलेल्या आदिवासी महिलाच्या सामाजिक आर्थिक समस्यांचा अभ्यास करुन त्या समस्या सोडविण्यासाठी उपाय योजना सुचविण्यात येतील त्यामुळेच सदर अभ्यासाला अनन्य साधारण महत्व आहे.

या सर्व प्रश्नांच्या अनुषंगाने "यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी महिलांचे जनजीवन व सद्यस्थिती एक समाजशास्त्रीय अध्ययन" या विषयाची निवड करण्यात आली.

१.४ अध्ययनाची उदिदष्टे :

प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात पुढील उदिदष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. आदिवासी समाजामधील महिलांच्या जनजीवनाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.
२. आदिवासी समाजामधील महिलांच्या कौटूंबिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
३. आदिवासी समाजामधील महिलांच्या शैक्षणिक व राजकिय सद्यस्थितीचा अभ्यास करणे.
४. आदिवासी समाजामधील महिलांना इतर सामाजिक क्षेत्रामध्ये प्राप्त झालेल्या दर्जाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.
५. आदिवासी समाजामधील महिलांच्या आर्थिक व आरोग्यविषयक सद्यस्थितीचा अभ्यास करणे.
६. आदिवासी समाजामधील प्रथा, परंपरा, संस्कृती याचा आदिवासी महिलांच्या जिवनमानावर पडलेल्या प्रभावाचा अभ्यास करणे.
७. आदिवासी समाजामधील महिलांच्या विकासाकरीता राबविण्यात येणाऱ्या शासकिय योजनांची परिणामकारकता अभ्यासणे.
८. आदिवासी समाजामधील महिलांच्या जिवनमानाच्या स्तरामध्ये वृध्दी करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

१.५ अध्ययनाची गृहीतकृत्ये :

प्रस्तुत अध्ययन विषयाच्या संदर्भात पुढील प्रमाणे गृहितकृत्ये निश्चित करण्यात आलेली आहे.

१. आदिवासी समाजामधील महिलांच्या जनजीवनाचा दर्जा समाधानकारक नाही.
२. आदिवासी समाजामधील महिलांच्या शैक्षणिक विकासाची गती मंद आहे.
३. आदिवासी समाजामधील महिलांना कुटूंबामध्ये प्राप्त झालेला दर्जा समानतेचा आहे.

४. आदिवासी समाजामधील महिलांना इतर सामाजिक क्षेत्रातील विविध कार्यक्रमामध्ये सहभागी होण्याची संधी प्राप्त होत नाही.

५. आदिवासी समाजामधील महिलांची आर्थिक स्थिती हालाकीची असून दयनिय आहे.

६. आदिवासी समाजामधील महिलांच्या राजकिय सहभागाला विरोध होतो.

७. आदिवासी समाजामधील प्रथा, परंपरा, संस्कृती याचा आदिवासी महिलांच्या जीवनमानावर प्रभाव टाकतात.

८. आदिवासी समाजामधील महिलांच्या विकासाकरीता राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजनांची परिपूर्णपणे अंमलबजावणी होतांना दिसून येत नाही.

१.६ अध्ययनाची व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तुत अध्ययनाची व्याप्ती व मर्यादा पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येतील.

१. प्रस्तुत संशोधन कार्य हे यवतमाळ जिल्हयांपूरतेच मर्यादित राहील.

२. या संशोधनामध्ये यवतमाळ जिल्हयांतील राळेगाव, मारेगाव, केळापूर (पांढरकवडा), झरी जामनी, कळंब पुसद व उमरखेड तालुक्यामधील आदिवासी महिलापूरतेच मर्यादित राहील.

३. या संशोधनामध्ये आदिवासी महिलांच्या जनजीवन विषयक सद्यस्थितीचा अभ्यास करण्यात येईल त्यामध्ये प्रामुख्याने या महिलांचा कौटूंबिक दर्जा, आर्थिक दर्जा, सामाजिक दर्जा, राजकीय दर्जा, वैद्यकिय स्थिती, शैक्षणिक स्थिती या बाबींच्या संदर्भातील सद्यस्थिती अभ्यासण्यात येईल.

४. या संशोधनामध्ये यवतमाळ जिल्हयांमधील प्रामुख्याने आंध, प्रधान, गोंड, कोलाम, पारधी, नायकडा या आदिवासी जमातीच्या महिलांचा समावेश करण्यात येईल.

१.७ संबंधित पूर्व संशोधनांचा आढावा :

संशोधनकर्त्याला त्याच्या संशोधनाच्या संबंधात आरंभापासून संशोधन क्षेत्रातील सखोल व अत्याधुनिक शोधाविषयी माहिती करून घेण्यासाठी संबंधित पूर्व संशोधन साहित्याचा आढावा घेणे व त्यामधील कमतरता शोधून आपल्या संशोधनाच्या माध्यमातून या पूर्व संशोधनामधील कमतरता दूर करण्यासाठी पूर्व संशोधन साहित्याचा आढावा घेणे महत्वाचे आहे. या संशोधनाच्या संदर्भात पीएच. डी., एम. फिल., विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मासिकांमध्ये आणि नियतकालींकामध्ये

प्रकाशित संशोधनपर लेख या माध्यमातुन प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भातील पूर्व संशोधनांचा आढावा पुढीलप्रमाणे घेण्यात येईल.

वागडव अप्पाराव रामराव (२०१२)

"मराठवाड्यातील आदिवासी महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक समस्यांचा अभ्यास" डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (पी.एच.डी. शोधप्रबंध, समाजशास्त्र)

ढोले शेकोबा परशुराम (२०१७)

ढोले शेकोबा परशुराम यांनी "आदिवासी विकास योजनांचे मुल्यमापन एक समाजशास्त्रीय अध्ययन" (विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा) या विषयावर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे समाजशास्त्र विषयात पी.एच.डी. करीता शोधप्रबंध सादर केलेला आहे.

कुमार दिलीप, मित्तल राहुल, (२०१७)

कुमार दिलीप, मित्तल राहुल यांनी सामाजिक विकासामध्ये आदिवासी महिलांच्या भूमिकेचा अभ्यास केला आहे. समाजामध्ये महिला आणि पुरूष वर्गाची भूमिका भिन्न भिन्न असल्याचे दिसून येते जसे की, पुरूष घराच्या बाहेर जाऊन कार्य करतात तर महिला हया घरामध्ये गृहकार्य करतांना दिसून येतात. त्यामुळे महिलांमध्ये आपल्या क्षमतांचा प्रभावी वापर करून आत्मनिर्भरता आणि आपले जनजीवन विकसित करण्याच्या क्षेत्रामध्ये मर्यादा निर्माण होत असल्याचे या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.

झाल्टे, ज्योती मुकुंदराव (२०१८)

मराठवाडयातील प्रमुख आदिवासी जमाती व त्यांच्या बोली एक अभ्यास यांनी आपल्या संशोधनात मराठवाडयातील प्रमुख आदिवासी जमाती व त्यांच्या बोलींचा आपल्या संशोधनामध्ये अभ्यासपूर्ण मांडणी केली असून बोलीभाषेचा लोप यावर प्रकाश टाकून यथासांग स्थितीचा आढावा घेतला आहे. विशेष संदर्भ म्हणून आंध, गोंड, भिल्ल, परधान व पारदी भाषेचा यामध्ये समावेश आहे.

कुमारी, रूबी (२०१८)

कुमारी, रूबी यांनी आपल्या संशोधनामध्ये झारखंडच्या राजकारणामध्ये महिलांची सहभागीतेचा अभ्यास या संशोधनामध्ये करण्यात आला. त्यांनी आपल्या संशोधनामध्ये स्पष्ट करण्यात आले की, महिलांच्या विकासाकरीता त्यांचे सामाजिक, आर्थिक, राजकीय विकास व सशक्तीकरण करने आवश्यक आहे. महिलांचा राजकीय क्षेत्रामधील सहभाग वाढल्यानंतरच

त्यांच्या स्थितीमध्ये सुधारणा होणे शक्य असल्याचे स्पष्ट केले आहे. समाजामध्ये महिलांची आत्मनिर्भरता, साहस, स्वाभीमानी वृत्ती हया बाबी राजकीय क्षेत्रामधील त्यांचे वर्चस्व सिध्द करणाऱ्या आहेत.

आत्राम, विरशहा (२०१९)

आत्राम, विरशहा यांनी आपल्या संशोधनामध्ये आदिवासी समाजामधील कुपोषणाची समस्या आणि त्यावर उपाययोजना यासंदर्भात संशोधन कार्य केले आहे. आजच्या काळामध्ये कुपोषणाची समस्या व्यापक असुन आदिवासी भागामध्ये याचे प्रमाण सर्वाधिक आहे. ज्या आदिवासी समुदायाचा शहरी भागाशी असलेला संपर्क कमी आहे, त्यांच्यामध्ये कुपोषणाचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे दिसून आले. शिवाय आदिवासी महिलांच्या आरोग्याकडे सातत्याने होणारे दुर्लक्ष, त्यांच्यामध्ये आरोग्य विषयक बाबींच्या संदर्भात असलेल्या जागरूकतेचा अभाव यामुळे आदिवासी समुदायामध्ये महिलांच्या कुपोषणाची स्थिती गभीर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

१.८ अध्ययन पध्दती :

प्रस्तुत अध्ययनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात येईल. त्यामध्ये यवतमाळ जिल्हयांमधील राळेगाव, मारेगाव, केळापूर (पांढरकवडा), झरी जामनी, कळंब, पुसद व उमरखेड या तालुक्यामधील गावांमध्ये निवास करीत असलेले आंध, परधान, गोंड, कोलाम, पारधी, नायकडा (भिल्ल) या जमातीच्या महिलांची निवड करून त्यांच्या जनजीवनाच्या संदर्भात असलेल्या सद्यस्थितीशी संबंधित यामध्ये शिक्षण विषयक स्थिती, कौटूंबिक दर्जा, सामाजिक दर्जा, आर्थिक अधिकार व आर्थिक स्थिती, राजकीय सहभागीता, प्रथा परंपरांचा जनजीवनावरील प्रभाव तथ्यांचे संकलन सर्वेक्षण पध्दतीच्या माध्यमातुन करण्यात येईल. अशा प्रकारे या अध्ययनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात येईल.

१.९ संशोधनाची जनसंख्या व नमूना :

प्रस्तुत संशोधनामध्ये यवतमाळ जिल्हयांमधील राळेगाव, मारेगाव, केळापूर (पांढरकवडा), झरी जामनी, कळंब, पुसद व उमरखेड या तालुक्यामधील गावांमध्ये निवास करीत असलेले आंध, परधान, गोंड, कोलाम, पारधी, नायकडा (भिल्ल) या जमातीच्या महिला प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या म्हणून निश्चित करण्यात येईल.

१.९.१ नमुना निवड :

प्रस्तुत संशोधनामध्ये यवतमाळ जिल्हयामधील आदिवासी बहुल क्षेत्र ज्यामध्ये प्रामुख्याने राळेगाव, मारेगाव, केळापूर (पांढरकवडा), झरी जामनी, कळंब, पुसद व उमरखेड या तालुक्याचा समावेश होतो. या संशोधनासाठी सहेतुक नमुना निवड पध्दतीने करण्यात आलेल्या प्रत्येक तालुक्यातील १० गावांची निवड करण्यात येईल. अशाप्रकारे संशोधनासाठी निवड करण्यात आलेल्या एकूण ७ तालुक्यामधून एकूण ७० गावांची निवड संशोधनासाठी करण्यात येईल. या गावांमध्ये व वस्ती व पाड्यावर निवास करीत असलेल्या आदिवासी बहुल गावांमधील आंध, परधान, गोंड, कोलाम, पारधी, नायकडा (भिल्ल) या आदिवासी जमातीच्या प्रत्येक गावांमधून अनुक्रमे ०६ आदिवासी महिलांची निवड सहेतूक नमूना निवड पध्दतीचा वापर करून करण्यात येईल. त्यामध्ये प्रत्येक तालुक्यामधून निवड करण्यात आलेल्या १० आदिवासी बहुल गावांमधून अनुक्रमे ६० आदिवासी महिलांची निवड करण्यात येईल अशा प्रकारे एकूण ७ तालुक्यामधील ७० गावांमधून एकूण ४२० आदिवासी महिलांची निवड या संशोधनासाठी करण्यात येईल.

कोष्टक क्र. १.१
संशोधनासाठी नमूना निवड दर्शविणारे कोष्टक

तालुके	गावांची निवड	यवतमाळ जिल्हयांमधील आदिवासी महिलांची निवड						एकूण
		आंध	परधान	गोंड	कोलाम	पारधी	नायकडा	
राळेगाव	१०	१०	१०	१०	१०	१०	१०	६०
मारेगाव	१०	१०	१०	१०	१०	१०	१०	६०
केळापूर (पांढरकवडा)	१०	१०	१०	१०	१०	१०	१०	६०
झरी जामनी	१०	१०	१०	१०	१०	१०	१०	६०
कळंब	१०	१०	१०	१०	१०	१०	१०	६०
पुसद	१०	१०	१०	१०	१०	१०	१०	६०
उमरखेड	१०	१०	१०	१०	१०	१०	१०	६०
एकूण	**७०**	**७०**	**७०**	**७०**	**७०**	**७०**	**७०**	**४२०**

१.१० संशोधनाची साधने :

प्रस्तुत अध्ययनासाठी पुढील साधनांचा वापर करण्यात येणार आहे.

१.१०.१ तथ्य संकलन :

यामध्ये आदिवासी समुदायामधील महिलांच्या जनजीवनाशी संबंधित सद्यस्थितीच्या संदर्भात मुलाखत अनुसूची माध्यमातुन प्राथमिक तथ्यांचे संकलन करण्यात येईल. या संशोधनाच्या संदर्भात आदिवासी महिलांची शैक्षणिक स्थिती, सामाजिक स्थिती, राजकीय स्थिती, आरोग्य विषयक स्थिती, कौटूंबिक व आर्थिक स्थिती, प्रथा, परंपरांचा महिलांच्या जनजीवनावरील प्रभाव यासंदर्भात प्राथमिक तथ्यांचे संकलन करण्यात येईल.

१.१०.२ व्दितीयक तथ्य संकलन :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या संदर्भात प्रकाशित झालेल्या व्दितीय स्त्रोताचा वापर करण्यात येईल. यामध्ये शासकीय स्तरावरील आदिवासी महिलांच्या संदर्भात प्रकाशित झालेले अहवाल, विविध अहवाल, नियतकालिके, विविध स्थानिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकाशित झालेल्या मासिकांमधील संशोधन पर लेख, आदिवासी विभागाच्या वेब साईटसवर प्रकाशित करण्यात आलेली आदिवासी महिलांच्या संदर्भात आवश्यक तथ्ये यांचे संकलन या संशोधनासाठी करण्यात येईल.

१.१०.३ साधनांचे प्रमाणिकरण :

प्रस्तुत संशोधनामध्ये प्राथमिक तथ्यांचे संकलन करण्यासाठी मुलाखत अनुसूची विकसित करण्यात येईल. या मुलाखत अनुसूचीमध्ये संशोधनाच्या उदिदष्टांच्या आधारावर प्रश्नांची रचना करण्यात येईल. त्यानंतर ही मुलाखत अनुसूची आदिवासी महिलांच्या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या तज्ञ व्यक्तींना तपासण्यासाठी देण्यात येईल, त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारावर आवश्यक सुधारण मूळ स्वरूपातील मुलाखत अनुसूचीमध्ये करण्यात येतील. त्यानंतर या मुलाखत अनुसूची आधारावर पथदर्शक अभ्यास करून, मुलाखत अनुसूची सोडवतांना संबंधित महिलांना येणाऱ्या अडचनी विचारात घेऊन आवश्यक सुधारणा करण्यात येतील अशा प्रकारे या संशोधनासाठी विकसित करावयाच्या मुलाखत अनुसूचीचे प्रमाणिकरण करण्यात येईल.

१.११ तथ्यांचे संकलन :

प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात प्राथमिक आणि व्दितीय तथ्यांचे संकलन करण्यात येईल. त्यामध्ये व्दितीयक तथ्यांचे संकलन विविध स्त्रोत साधनांच्या माध्यमातुन करण्यात येईल तर प्राथमिक तथ्यांचे संकलन संशोधकाकडून प्रत्यक्षरीत्या कार्यक्षेत्रावर जाऊन करण्यात येईल.

१.१२ सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन :

प्रस्तुत संशोधनासाठी वारंवारीता, शेकडेवारी, आलेख या सारख्या सांख्यिकीय साधनांचा वापर करण्यात येणार असून संकलीत तथ्याचे सांकेतिकरण व विश्लेषण करुन अर्थनिर्वचना अंती निष्कर्ष काढण्यात येणार आहेत. प्राप्त निष्कर्षाच्या अनुषंगाणे आदिवासी महिलांच्या उन्नतीसाठी महत्वपुर्ण शिफारशी करण्यात येणार आहे.

१.१२.१ सांख्यिकीय तंत्रे :

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात येईल.

- वारंवारीता
- शेकडा प्रमाण
- आलेख

१.१३ निष्कर्ष :

प्रस्तुत संशोधनामध्ये निर्धारित करण्यात आलेल्या उदिदष्टांच्या आधारावर आणि प्राप्त तथ्यांच्या आधारे निष्कर्ष मांडण्यात येतील.

१.१४ शिफारशी :

प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात निश्चित निष्कर्षाच्या आधारे शिफारशींची मांडणी करण्यात येणार असून या शिफारशीचा आदिवासी समाजातील महिलांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी व सबलीकरणासाठी नक्कीच फायदा होणार आहे. यादृष्टीने महत्वाच्या शिफारशी करण्यात करण्यात येतील.

१.१५ प्रकरण रचना :

प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात प्रकरणांची रूपरेखा पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येईल.

प्रकरण १ ले : प्रस्तावना

या प्रकरणामध्ये संशोधन विषयाबाबत प्रस्तावना, अध्ययन विषयाची निवड, संशोधनाची उदिदष्टे, गृहीत कृत्ये, अध्ययन विषयाचे महत्व, अध्ययनाची व्याप्ती व मर्यादा याबाबत माहिती देण्यात येईल.

प्रकरण २ रे : संशोधन पध्दती व पूर्व संशोधन साहित्याचा आढावा

सदर संशोधनासाठी वापरण्यात येणारी सर्वेक्षण पध्दती, संशोधन अध्ययन क्षेत्र, संशोधनाची जनसंख्या व नमूना निवड, तथ्यांचे संकलन याबाबत माहिती देण्यात येईल.

प्रकरण ३ रे : यवतमाळ जिल्हयांची पार्श्र्वभूमी व आदिवासी जमाती

या प्रकरणामध्ये यवतमाळ जिल्ह्याचा इतिहास, यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी समुदाय त्यांचा इतिहास व आदिवासी जमाती या बाबत माहिती देण्यात येईल.

प्रकरण ४ थे :यवतमाळ जिल्हयांतील आदिवासी महिलांसाठीच्या विकास योजना व जिवनमान

या प्रकरणामध्ये यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी महिलांचे जिवनमान, त्यांची परिस्थिती व त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विकास योजना यांचा सविस्तर आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण ५ वे : यवतमाळ जिल्हयांतील आदिवासी महिलांची सामाजिक, शैक्षणिक व राजकिय स्थिती

या प्रकरणामध्ये यवतमाळ जिल्ह्यातील महिलांची सामाजिक स्थिती, शैक्षणिक स्थिती व राजकिय स्थितीचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण ६ वे : यवतमाळ जिल्हयांतील आदिवासी महिलांची कौटूंबिक, आर्थिक व आरोग्य विषयक स्थिती

या प्रकरणामध्ये यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी महिलांची कौटूंबिक स्थिती, आर्थिक स्थिती व आरोग्यविषयक स्थितीचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण ७ वे : निष्कर्ष व शिफारशी

या प्रकरणात एक ते सहा मधील प्रकरण रचना अध्ययनातून गृहीतकृत्यांची पडताळणी करण्यात यईल. अध्ययनातून प्राप्त निष्कर्षाची मांडणी करण्यात येईल. यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी जमातीतील महिलांच्या उन्नतीसाठी आवश्यक त्या शिफारशी करण्यात येतील.

संदर्भ ग्रंथ सुची :

या संशोधनासाठी वापरण्यात आलेले संदर्भ ग्रंथाची सुची मराठी, इंग्रजी व हिंन्दी संदर्भ ग्रंथनिहाय देण्यात येईल. तसेच विविध संशोधन लेख याची यादी जोडण्यात येईल.

परिशिष्टे :

प्रस्तुत संशोधनासाठी वापरण्यात आलेली साधने, महिलांची नावे, सांख्यिकीय माहिती, फोटोग्राफ परिशिष्टांमध्ये जोडण्यात येतील.

संदर्भ ग्रंथ :

१. आगलावे, प्रदिप (२०००), संशोधन पध्दतीशास्त्र. नागपूर : साईनाथ प्रकाशन

२. अवस्थी, राजेंद्र (१९६२), हमारे आदिवासी. मुंबई : मुंबई पब्लिकेशन

३. आदिवासी विकास विभाग माहिती पुस्तिका महाराष्ट्र शासन आदिवासी विभाग, मुंबई

४. उत्प्रेती, हरिशचंद्र (२००७), भारतीय जनजातियां सरंचना एव विकास. जयपुर : राजस्थान हिंन्दी ग्रंथ अकादमी

५. गारे, गोविंद (२००१), पैनगंगा नदीच्या खोऱ्यातील आंध-आदिवासी

६. चवरे, रा. गो. (२०१०), आंध जमात-साहित्य आणि संस्क़ृती

७. जोशी, रामशरण (१९९६), आदिवासी समाज और शिक्षा. नई दिल्ली : ग्रंथशिल्पी पब्लिकेशन

८. नदीम, हुसैन (२०१३), जनजातीय भारत, नई दिल्ली : जवाहर पब्लिशर्स एण्ड डिस्टीब्यूटर्स

९. नाईक, शोभा (२००७), भारतीय संदर्भातून स्त्रीवाद, स्त्रीवादी समीक्षा आणि उपाययोजना

१०. पाटील, नलिनी (२००१), आदिवासी महिलांच्या शैक्षणिक समस्या

११. पिचड, नलिनी (२००५), आदिवासींचे शिक्षण, पुणे

१२. बाळ, शरयु (१९६३), भारतीय थोर स्त्रीया. पुणे :दांडेकर प्रकाशन

१३. मांडवकर, भाऊ (१९६६), कोलाम

१४. मिश्रा, विपुल (२०१२), भारतीय जनजातियों का सामाजिक एवं सांस्कृतिक अध्ययन. जयपुर : रितु पब्लिकेशन्स

१५. महिला व बालविकास धोरण आणि निर्णय एक दृष्टीक्षेप यशदा, पुणे

१६. रानी, आशु (१९९७), महिला विकास कार्यक्रम, जयपुर : इना श्री पब्लिशर्स

१७. वर्धन ए. बी. (१९७६), आदिवासींची न सुटलेली समस्या

१८. शर्मा इन्दु, अग्रवाल शिवाली (२०११), महिला सशक्तिकरण के नये आयाम. नई दिल्ली : राधा पब्लिकेशन

१९. सोरे, नागोराव (२०२०), यवतमाळ जिल्हयांतील आदिवासी जमाती

संशोधक

शीतल चंद्रकांत डवले

मार्गदर्शक

प्रा. डॉ. शेकोबा परशुराम ढोले
सहा. प्राध्यापक
श्री दत्त कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
हदगाव